# B.A. Part—II (Semester—IV) Examination
## (Literature of Modern Language)
## MARATHI LITERATURE

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

सूचना :—(1) सर्व प्रश्न सोडिविणे आवयश्यक आहे.

(2) बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित धरल्या जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा :— 16

(अ) ''दिवंजी साहेब तुम्ही काही म्हणा हा परल्या काई शिकला तर उतीम लोकांच्यावर पंगतीला बसणं बर नाही त्याला हे घातक है कारण त्याने आपल्या पायरीनेच वागावं.''

किंवा

''अरं बापू नवकरी जरा चांगलं मन लावून कर तू बाबा. व्हईल जाळभाज घराची.''

(आ) ''काय वरलू महाराज आता तुझा भार है गड्या खात जार बाबा पडलं सुडलं, काय व्हणार है पैसे लई कमवून. तुबी माणुस हैईस''.

किंवा

''कारं परलाद, राहातूस का तू मज्याईत. तुला दुकान करुन देतो. बरी धा वरीष राहावं लागल तुला. आदीच बोल ठाक ठोक म्हाणून लोक काय म्हणतील. धा वरीस ऱ्हाईलास तर तुजं लगीन करुन देतो. तमाम खरच मी करतो.''

(इ) ''महात्मे हा एथा : जाओं : ये गावीं उकरडा माणुस व्याला: गावांसि अरिष्ट म्हणौनि सांति करितातिः तेय चला भूगति करूं जाओं:''

किंवा

'आना ए: हा हस्तिचा एकु एकु अवयेउ होए: परि: हस्ति नव्हे : ऐसा अवयेवी युक्त तो हस्तिः'

(ई) ''आम्हां जैसा पुत्रसोखू जाला : तैसा तुज हो :''

किंवा

'हा गा : दुध तें कैसे' ? 'दुध ते पांढरे' : 'पांढरे तें कैसै' ?

'पांढरे ते बलुहेसारीखे: बळ्हे ते कैसीं ? बळ्हे ते रुम्हणेयासारीखी': रुम्हणें ते कैसे ? 'रुम्हणें ते ऐसें : म्हणौनि हातु वांकुडा करुनि पाहिलें :।

2. 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा. 16

किंवा

प्रल्हादच्या शिक्षणासाठी चाललेल्या संघर्षाचे चित्रण करा.

3. (अ) 'अक्का' चे स्वभावचित्र रेखाटा. 8

किंवा

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील भाषेची वैशिष्ट्ये विशद करा.

(आ) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून आलेल्या जातिव्यवस्थेचे चित्रण करा. 8

किंवा

प्रल्हादला महाविद्यालयीन जीवनांत आलेल्या वेगवेगळ्या अनुभवासंबंधी थोडक्यात लिहा.

4\. (अ) लीळाचरित्रातील निवडक कथांच्या आधारे यादवकालीन भाषेचे स्वरूप विशद करा. 8

किंवा

लीळाचरित्रातील निवडक कथांमधून आपल्याला आवडलेल्या एका लिळेविषयी थोडक्यात लिहा.

(आ) लीळाचरित्रातील निवडक कथांमधून आलेल्या विनोदाचे चित्रण करा. 8

किंवा

श्री चक्रधरस्वामींच्या अलोकिक व्यक्तिमत्वाचा परिचय करून द्या.

5\. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नासाठी अचक पर्याय निवडा : 16

(1) 'रोटी' नसली की प्रल्हाद काय खातो ?

(अ) ब्रेड (ब) भाकरी

(क) बोरे (ड) चिंचोके

(2) प्रल्हादची पहिली चप्पल किती रुपयाची होती ?

(अ) दोन रुपये (ब) पाच रुपये

(क) एक रुपया (ड) दहा रुपये

(3) 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन कोणत्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाले ?

(अ) ग्रामीण साहित्या संमेलन (ब) दलित साहित्य संमेलन

(क) विद्रोही साहित्य संमेलन (ड) मराठी साहित्य संमेलन

(4) प्रल्हादच्या मोठ्या बहिणीचे नाव काय ?

(अ) बाई (ब) माई

(क) अक्का (ड) ताई

(5) आली सुगी फुगले गाल नि गेली सुगी ________ .

(अ) पुढे हाल (ब) रोज हाल

(क) हाल हाल (ड) मागचे हाल

(6) लहाणपणी प्रल्हादच्या गळ्यात कोणत्या पंथाची माळ होती ?

(अ) महानुभाव (ब) शैव

(क) वारकरी (ड) वैष्णव

(7) प्रल्हादच्या मूल गावाचे नाव काय ?

(अ) औरंगाबाद (ब) उस्मानाबाद

(क) सुल्लाळी (ड) शिरपूर

(8) प्रल्हादने कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेतला ?

(अ) मिलिंद महाविद्यालय (ब) जनता महाविद्यालय

(क) भारतीय महाविद्यालय (ड) शिवाजी महाविद्यालय

(9) 'सत्यापूर' या गावाचे बदललेले नाव कोणते ?

(अ) सोलापूर (ब) बगळेगाव

(क) बळ्हेग्राम (ड) सुरत

(10) 'लीळाचरित्र' या ग्रंथात कोणाच्या लीळांचे संकलन करण्यात आलेले आहे ?

(अ) श्रीकृष्ण (ब) गोविंदप्रभू

(क) श्रीचक्रधर (ड) नागदेवाचार्य

(11) 'हत्तीचादृष्टांत' श्रीचक्रधरांनी पुढीलपैकी कोणा सोबतच्या चर्चेदरम्यान सांगितला ?

(अ) केशोबास (ब) बाईसा

(क) नागदेवाचार्य (ड) म्हाइंभट

(12) श्री चक्रधरांसाठी टणक लाडू तयार करणाऱ्या शिष्येचं नाव काय होतो ?

(अ) बाईसा (ब) उमाईसा

(क) एल्हाइसा (ड) बोणेबाई

(13) श्रावणाच्या आईवडीलांनी दशरथाला कोणता शाप दिला ?

(अ) पुत्रशोक (ब) मातृशोक

(क) बंधुशोक (ड) पितृशोक

(14) ससीकरक्षणांची कथा कोणत्या जंगलात घडली ?

(अ) दंडकारण्य (ब) सालबर्डी

(क) भंडारा (ड) मेळघाट

(15) इंद्राच्या हत्तीसोबत स्वर्गात जाणाऱ्या शेतकऱ्याचे नाव काय ?

(अ) धीरज (ब) धांदल

(क) श्रीधर (ड) रामेश्वर

(16) युधिष्ठिराने कोणता यज्ञ केला ?

(अ) पुत्रकामेष्टी (ब) अश्वमेध

(क) राजसूय (ड) यापैकी नाही